# गृहपाठ – शिक्षक मूल्यांकन 2023
# विषय – मराठी (20४)

एकूण गुण – २०

सूचना – १) दिलेल्या सुचनेप्रमाणे प्रश्नांची उत्तरे लिहिणे आवश्यक आहे.
२) उत्तरपत्रिकेत पहिल्या पानावर वरच्या बाजूस आपले नांव, नोंदणी क्रमांक, अभ्यासकेंद्राचे नांव, विषय इत्यादि माहिती स्पष्ट शब्दांत लिहावी.

---

प्रश्न – १. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर ४० ते ६० शब्दांमध्ये लिहा. गुण – २

अ) मास्तराच्या सहवासाने झेल्याच्या वर्तनात कोणता बदल झाला? (पाठ-१)

ब) श्रावणमासात फुलणाऱ्या फुलाचे वर्णन बालकवी कसे करतात? (पाठ-४)

प्रश्न – २. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर ४० ते ६० शब्दांमध्ये लिहा. गुण – २

अ) भारताच्या भौगोलिक विविधतेशी संबधित कोणते पौराणिक संदर्भ लेखकाच्या मनात आले? (पाठ-९)

ब) "सागरास" या कवितेतील कवी कशाला पारखा झाला? (पाठ-८)

प्रश्न – ३. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर ४० ते ६० शब्दांमध्ये लिहा. गुण – २

अ) राज्यस्थापनेच्या कार्यास कसे वाहून घ्यावे असे रामदास स्वामी सांगतात? (पाठ-१२)

ब) सोनं आणि माती पदरात घेते असे घरधनीज का म्हणते? (पाठ-११)

प्रश्न – ४. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर १०० ते १५० शब्दांमध्ये लिहा. गुण – ४

अ) डोंबाऱ्यांनी कोणकोणते कसरतीचे खेळ करून दाखवले?. (पाठ-१४)

ब) ईश्वराची पाऊले कधी दिसली का या कवीच्या प्रश्नाला चांदण्या काय उत्तर देतात? (पाठ-१८)

प्रश्न – ५. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर १०० ते १५० शब्दांमध्ये लिहा. गुण – ४

अ) डॉ. कलाम कोणते आवाहन करतात?. (पाठ-२३)

ब) परिच्छेदलेखन म्हणजे काय ते सांगून परिच्छेद लेखनात कोणत्या गोष्टी आवश्यक असतात? (पाठ-३१)

प्रश्न – ४. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर ५०० शब्दांमध्ये प्रकल्प तयार करा. गुण – ६

अ) संभाषण कौशल्य म्हणजे काय? संभाषण कौशल्यासाठी आवशयक गोष्टी आणि संभाषण कलेचे फायदे यांविषयी माहिती देणारा एक तक्ता तयार करा. (पाठ-२७)

ब) महाराष्ट्रातील थोर संत, त्यांचा परिचय, त्यांचे कार्य आणि संतांची साहित्य निर्मिती यांविषयी माहिती देणारा सचित्र तक्ता तयार करा. (पाठ-१५)